जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

हॉकीचे जादूगार म्हणून जगद्विख्यात असणारे भारताचे मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडादिन उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. एन. डी. पाटील, किरण पाटील, राजेंद्र रायकर, राम पवार, सुचय खोपडे, बृहस्पती शिंदे, मनीषा शिंदे, कृष्णात पाटील यांच्यासह क्रीडा अधिविभागाचे विद्यार्थी आणि खेळाडू उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2025
सकाळ

# विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

कोल्हापूर : हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आज राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. एन. डी. पाटील, किरण पाटील, राजेंद्र रायकर, राम पवार, सुचय खोपडे, बृहस्पती शिंदे, मनीषा शिंदे, कृष्णात पाटील यांच्यासह क्रीडा अधिविभागाचे विद्यार्थी आणि खेळाडू उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2025
सकाळ

# विद्यापीठात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

कोल्हापूर : हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आज राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. एन. डी. पाटील, किरण पाटील, राजेंद्र रायकर, राम पवार, सुचय खोपडे, बृहस्पती शिंदे, मनीषा शिंदे, कृष्णात पाटील यांच्यासह क्रीडा अधिविभागाचे विद्यार्थी आणि खेळाडू उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2025
लोकमत

# 'संत गजानन' अभियांत्रिकीचे ११ विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** महागाव येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अकरा विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येण्याचा मान पटकाविला. इलेक्ट्रिकल विभागाच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत आघाडी घेतली आहे. इलेक्ट्रिकलची अनुराधा पाटील व इलेक्ट्रॉनिक्स विभागाची जयश्री होळी यांनी विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविला.


अनुराधा पाटील, जयश्री होळी, रिद्धी दोरुगडे, सानिका शिंगटे, विवेक मोरे


नेहा राऊत, ऋतुजा मोरबाळे, सत्यम चौगुले, सानिका सावंत, राहुल दरुटे, साक्षी दावणे

इलेक्ट्रिकलमध्ये रिद्धी दोरुगडे (द्वितीय), सानिका सावंत(तृतीय), सानिका शिंगटे(चतुर्थ), नेहा राऊत (सातवा), राहुल दरुटे (दहावा) क्रमांक.

इलेक्ट्रॉनिक्समध्ये ऋतुजा मोरबाळे (द्वितीय), साक्षी दावणे (आठवा), तर मेकॅनिकलमध्ये सत्यम चौगुले (पाचवा), विवेक मोरे (आठवा) क्रमांक पटकाविला.

विद्यार्थ्यांना संस्थाध्यक्ष ॲड. डॉ. अण्णासाहेब चव्हाण, विश्वस्त डॉ. यशवंत चव्हाण, डॉ. संजय चव्हाण, डॉ. प्रतिभा चव्हाण, डॉ. सुरेखा चव्हाण, सचिव ॲड. बाळासाहेब चव्हाण, प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांचे प्रोत्साहन, तर शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. ( वा.प्र.)

3 0 AUG 2025
तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एसजीएम'च्या विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश

## अभियांत्रिकीचे ११ विद्यार्थी 'टॉप टेन'मध्ये : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीत दबदबा

वार्ताहर
महागाव

शिवाजी विद्यापीठामार्फत एप्रिल–मे २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेची गुणवत्तायादी जाहीर झाली आहे. यामध्ये गडहिंग्लज (ता. महागाव) येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले.

महाविद्यालयातील तब्बल ११ विद्यार्थी विद्यापीठाच्या 'टॉप टेन' गुणवत्तायादीत झळकत गुणवत्तेची परंपरा कायम ठेवली आहे. दरवर्षी मिळणारे यश म्हणजे महाविद्यालयाच्या प्रगतीला आणि विद्यार्थ्यांच्या कष्टाला मिळालेली मोठी दाद असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.


अनुराधा पाटील


जयश्री होळी


रिद्धी दोरुगडे


ऋतुजा मोरबाळे

या यशात सर्वाधिक भरारी इलेक्ट्रिकल विभागाने घेतली आहे. या विभागातील अनुराधा पाटील व इलेक्ट्रॉनिक्स विभागातील जयश्री होळी या विद्यार्थिनीने विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाचा मान उंचावला. त्याचप्रमाणे इलेक्ट्रिकल मधून रिद्धी दोरुगडे (द्वितीय), सानिका सावंत (तृतीय), सानिका शिंगटे (चौथा), नेहा राऊत (सातवा), राहुल दरुटे (दहावा), इलेक्ट्रॉनिक्स विभागातून ऋतुजा मोरबाळे (द्वितीय), साक्षी दावणे (आठवा), मेकॅनिकल मधून सत्यम चौगुले (पाचवा), विवेक मोरे (आठवा) क्रमांक पटकावत पहिल्या दहामध्ये आपले स्थान पक्के केले.

या यशाबद्दल संस्थाध्यक्ष ॲड. डॉ. अण्णासाहेब चव्हाण म्हणाले, विद्यार्थ्यांनी प्रामाणिक मेहनत, चिकाटी आणि जिद्द यांच्या जोरावर हे यश मिळवले आहे. प्रति वर्षप्रमाणे गुणवत्ता यादीत याही वर्षी विद्यार्थ्यांना मिळालेले स्थान अभिमानास्पद बाब असून हे आमच्या संस्थेसाठी गौरवाचे पान आहे.

या यशामागे महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक वर्ग व पालकांचा मोठा वाटा आहे. आमचे विद्यार्थी भविष्यातही ज्ञान, कौशल्य आणि चारित्र्य यांच्या जोरावर समाजहितासाठी कार्य करतील, याचा आम्हाला विश्वास आहे.

यावेळी विश्वस्त डॉ. यशवंत चव्हाण, डॉ. संजय चव्हाण, सचिव ॲड. बाळासाहेब चव्हाण, प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत 'शिवराज'चे विद्यार्थी चमकले

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येथील शिवराज महाविद्यालयाचा बी.एस्सी. केमिस्ट्रीमध्ये रिचा पाटील ९५.३३ टक्के प्रथम क्रमांक व रिया पाटीलने ९५ टक्के गुण मिळवून व्दितीय क्रमांक तर पदव्युत्तर विभागाच्या अक्षता रजपूत एम. ए.(हिंदी) मध्ये ७३.९१ टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक तसेच एम. कॉम. परीक्षेत धनश्री कुंभार ७३.७७ टक्के व वैशाली साबळे ७३.५० टक्के गुण मिळवून अनुक्रमे आठवा व नववा क्रमांक पटकाविला. या यशाबद्दल महाविद्यालयाच्यावतीने अभिनंदन करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, सचिव डॉ. अनिलराव कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्वीजय कुराडे, संचालिका प्रा. बिनादेवी कुराडे यांचे प्रोत्साहन व प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, डॉ. महेश चौगुले, डॉ. ए. एम. हसुरे, डॉ. एन. बी. ईकिले व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. दिगंबर देसाई व अभिजित भाटले यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 AUG 2025
पुढारी

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्

Estd : 1962
NAAC "A++" Grade
With CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
# DEPARTMENT OF TECHNOLOGY

**(AICTE Approved and Recognized by DTE & Govt. of Maharashtra)**

Supported under TEQIP (Technical Education Quality Improvement Program) Phase II and III Grants through World Bank, State Govt. and MHRD, New Delhi.

## Institute Code : EN6028

| B.Tech. (4 Years) | Intake |
|---|---|
| Civil Engineering | 60 |
| Chemical Engineering | 60 |
| Computer Sci. & Tech. | 60 |
| Electronics & Tele. Engg. | 60 |
| Food Technology | 60 |
| Mechanical Engineering | 60 |

| M.Tech. (2 Years) | Intake |
|---|---|
| Computer Sci. & Tech. | 06 |
| Electronics & Tele. Engg. | 06 |
| Energy Technology | 06 |
| Environmental Sci. & Tech. | 06 |
| Food Technology | 06 |
| PG Diploma in Process Safety Management | 40 |

**Master of Commerce (Valuation of Real Estate) 50**

**Office No. : 0231-2609424** **Website : https://apps.unishivaji.ac.in**

- Engineering Institute established & managed by Shivaji University, Kolhapur
- Sprawling scenic campus with well-equipped Class Rooms, Laboratories, Sports & Cultural Facilities
- Highly qualified and well experienced faculty members & support staff.
- Decent Separate University Hostels for Boys & Girls with excellent mess and recreational facilities.
- All government scholarships & freeships are available as per rules.
- A good track of campus placements. Emphasis for training programs & 100 % Assistance for Placement.

Date : 30-08-2025

**Dr. V. N. Shinde**
Registrar